Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. १७ जून २०२६ । वर्ष १ । अंक ७२ । पाने २।
DIGITAL EDITION

कुटुंबातच होणाऱ्या वाटणीची मोजणी आता २०० रुपयात!
(पान २ वर)



### ठाकरे गटाचे ६ खासदार 'नॉट रिचेबल', 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना उधाण

# राज्याच्या राजकारणात पुन्हा भूकंपाची चाहूल?

## दिल्लीत गुप्त हालचालींना वेग; संजय राऊतांचा '१५ कोटी अॅडव्हान्स'चा गंभीर आरोप

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : नवी दिल्ली / मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय भूकंपाची शक्यता व्यक्त केली जात असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील तब्बल सहा खासदार 'नॉट रिचेबल' असल्याच्या चर्चेमुळे राजकीय वातावरण तापले आहे.**

हे खासदार दिल्लीत दाखल झाल्याची माहिती समोर येत असून, ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांनी वेग घेतला आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, या संभाव्य घडामोडींसाठी शिंदे गटाकडून पुन्हा एकदा 'ऑपरेशन टायगर' राबवले जात असल्याची चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे स्वतः दिल्लीत दाखल झाल्याने या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिंदे यांनी यापूर्वी राजस्थानमधील जयपूर येथे जाऊन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर ते तातडीने दिल्लीत



दाखल झाले. सूत्रांच्या दाव्यानुसार, दिल्लीत शिंदे आणि ठाकरे गटातील काही खासदारांमध्ये गुप्त बैठक पार पडली असून, या बैठकीला खासदार श्रीकांत शिंदेही उपस्थित होते. या सर्व हालचालींच्या पार्श्वभूमीवर संबंधित खासदार प्रथम लोकसभेत स्वतंत्र गट स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण करतील आणि त्यानंतर तो गट शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन करण्याची रणनीती आखण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दरम्यान, आगामी १९ जून रोजी शिवसेनेचा वर्धापन दिन असल्याने याच दिवशी संबंधित खासदारांचा अधिकृत पक्षप्रवेश होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. या घडामोडींमुळे ठाकरे गटात मोठी खळबळ उडाली असून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केल्याचे सांगितले जात आहे. लोकसभेतील ठाकरे गटाचे नेते अरविंद सावंत यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवून कोणत्याही संभाव्य फुटीर गटाला स्वतंत्र मान्यता देऊ नये, अशी मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. याचवेळी ठाकरे गटाचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमुळे राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले आहे. "महाराष्ट्रातील खासदारांना विकत घेण्यासाठी आज रात्री प्रत्येकी १५ कोटी रुपयांचा अॅडव्हान्स दिला जात आहे," असा गंभीर आरोप त्यांनी केला असून, या पोस्टमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही टॅग करण्यात आले आहे. दरम्यान, परभणीचे संजय जाधव, हिंगोलीचे नागेश पाटील आष्टीकर, यवतमाळ-वाशिमचे संजय देशमुख, धाराशिवचे ओमराजे निंबाळकर आणि संजय दिना पाटील यांसह काही खासदार दिल्लीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र, या सर्व घडामोडींवर संबंधितांकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

### एकनाथ शिंदे स्वतः दिल्लीत दाखल

आगामी काही दिवसांत या चर्चांना प्रत्यक्षात कितपत मूर्त स्वरूप येते आणि ठाकरे गटातील संभाव्य राजकीय घडामोडी कोणते नवे वळण घेतात, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.शिंदे गटाकडून पुन्हा एकदा 'ऑपरेशन टायगर' राबवले जात असल्याची चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे स्वतः दिल्लीत दाखल झाल्याने या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शिंदे यांनी यापूर्वी राजस्थानमधील जयपूर येथे जाऊन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर ते तातडीने दिल्लीत दाखल झाले.

Selected

### मुलीच्या विनयभंग प्रकरणी डॉक्टराला दोन दिवसांची कोठडी

पारोळा | प्रतिनिधी : पारोळा तालुक्यातील एका गावात सात वर्षीय मुलीच्या कथित विनयभंग प्रकरणी अटक करण्यात आलेल्या एका डॉक्टराला न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून संबंधित डॉक्टराविरुद्ध विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संशयित डॉ. भास्कर रामराव पाटील यांनी तिचा कथित विनयभंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर पीडित मुलीच्या आईने पोलिसांकडे फिर्याद दाखल केली. तसेच पीडितेच्या वडिलांनी आपत्कालीन ११२ क्रमांकावर संपर्क साधून मदत मागितल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कारवाई सुरू केली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

### माजी राज्यमंत्री देवकर यांची साडेचार कोटींची फसवणूक

#### एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** माजी राज्यमंत्री तथा श्रीकृष्ण शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळाचे पदाधिकारी गुलाबराव बाबुराव देवकर यांच्या तक्रारीवरून तब्बल ४ कोटी ८५ लाख ३ हजार ५८२ रुपयांच्या अपहार आणि फसवणुकीचा गंभीर गुन्हा एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात एकच खळबळ उडाली असून आर्थिक व्यवहारांतील कथित गैरव्यवहाराबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुलाबराव बाबुराव देवकर (वय ७०, रा. वास्तुनगर, सावखेडा शिवार, जळगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीत लोकेश उर्फ चेतन गणेश कोल्हे (रा. नशिराबाद, ता. जि. जळगाव) याच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, आरोपीने दि. १ ऑगस्ट २०२० ते ३१ मे २०२३ या कालावधीत विश्वास संपादन करून श्रीकृष्ण शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये कथित गैरव्यवहार केला. संस्थेच्या निधीचा अपहार करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, या गैरव्यवहारातून संस्थेचे ४ कोटी ८५ लाख ३ हजार ५८२ रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५४६/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहितेअंतर्गत फसवणूक, विश्वासघात, बनावट कागदपत्रांची निर्मिती आणि त्यांचा वापर यासंबंधीच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास एमआयडीसी पोलीस आर्थिक गुन्हे शाखेच्या मदतीने करीत असून संबंधित आर्थिक व्यवहारांची कागदपत्रे, बँक व्यवहार आणि इतर पुराव्यांची छाननी सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नसून तपासाच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. शैक्षणिक संस्थेतील इतक्या मोठ्या रकमेच्या कथित अपहारामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून तपासातून नेमके सत्य काय समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### 'आधार' ओळखीचाच पुरावा असायला हवा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (युआयडीएआय) ने जारी केलेल्या आधार कार्डचा वापर नागरिकत्व, अधिवास (डोमिसिल) आणि रहिवासी पत्त्याचा पुरावा म्हणून केला जात असल्याचा आरोप करणाऱ्या एका याचिकेची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांकडून स्पष्टीकरण मागितले आहे. आधार कार्डचा उपयोग केवळ 'ओळख पडताळणीपुरताच' मर्यादित ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारसह देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना नोटीस बजावली आहे.

### नीट फेरपरीक्षेचाही पेपर फुटल्याची अफवा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ने आगामी 'नीट' फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडिया आणि विविध इंटरनेट प्लॅटफॉर्म्सवर पसरणाऱ्या पेपर फुटीच्या अफवांना चाप लावण्यासाठी एक मोठे पाऊल उचलले आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच टेलिग्राम, व्हॉट्सअॅप आणि इतर समाजमाध्यमांवर बनावट प्रश्नपत्रिका, पेपर लीकचे खोटे दावे आणि फसव्या लिंक्स मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असल्याचे समोर आले आहे. या प्रकारांमुळे प्रामाणिक विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, अशा कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता विद्यार्थ्यांनी पूर्णपणे सतर्क राहावे, असे आवाहन एनटीएने केले आहे. या बनावट वेबसाईट, सायबर फसवणूक आणि प्रश्नपत्रिका



फुटीच्या खोट्या दाव्यांना आळा घालण्यासाठी एनटीएने एक विशेष नवीन तक्रार पोर्टल सुरू केले आहे. जर कोणत्याही विद्यार्थ्याला किंवा नागरिकाला सोशल मीडियावर पेपर विक्रीचे आमिष दाखवणारे ग्रुप्स, फसव्या लिंक्स किंवा संशयास्पद हालचाली आढळून आल्या, तर ते या अधिकृत पोर्टलवर थेट आपली तक्रार नोंदवू शकतात. तक्रारदाराची माहिती पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल आणि अशा गैरप्रकारांवर सायबर सेलच्या मदतीने तातडीने कायदेशीर कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांनी केवळ एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या सूचनांवरच विश्वास ठेवावा, असेही याद्वारे बजावण्यात आले आहे.



### पंतप्रधान मोदी यांचा स्लोवाकियात सन्मान

स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रीनी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च राज्य सन्मान 'द ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस, फर्स्ट क्लास' प्रदान केला. या विशेष सन्मानाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष, सरकार आणि तिथल्या जनतेचे मनापासून आभार मानले. हा पुरस्कार म्हणजे भारतातील १.४ अब्ज जनता आणि भारत व स्लोव्हाकिया यांच्यातील मैत्रीचे दृढ बंध यांना वाहिलेली मानवंदना असल्याचे त्यांनी नमूद केले.

### मान्सूनची सद्यस्थिती चिंताजनक; जूनमध्ये फक्त ३२ टक्के पाऊस

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** देशातील मान्सूनची सध्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली असल्याचे, खासगी हवामान एजन्सी स्कायमेटचे संचालक जी. पी. शर्मा यांनी म्हटले आहे. मुळातच यंदा मान्सूनचे आगमन उशिराने झाले असून, सुरुवातीचे काही दिवस प्रगती केल्यानंतर गेल्या एका आठवड्यापासून तो पूर्णपणे थबकला आहे. ८ जूनपासून मान्सूनची वाटचाल थांबली असून, तो कोकण किनारपट्टीवरून एक इंचही पुढे सरकलेला नाही.

यासोबतच, जून महिन्यातील पावसात आतापर्यंत फक्त ३२ टक्क्यांची नोंद झाली असून, मोठी तूट जाणवत आहे. 'एल-निनो'चा वाढता प्रभाव या चिंतेत आणखी भर घालत आहे, असे 'स्कायमेट'ने म्हटले आहे. मान्सूनच्या या रखडलेल्या स्थितीचा थेट आणि सर्वात मोठा फटका कृषी क्षेत्राला बसत आहे. शर्मा यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, जून महिन्याचा दुसरा पंधरवडा आणि जुलै महिन्याचा पहिला पंधरवडा हा खरीप पेरण्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा काळ असतो.

देशातील बहुतांश पेरण्या याच काळात होतात. मात्र, पावसाने ओढ दिल्यामुळे पेरणीच्या या महत्त्वपूर्ण हंगामासमोर सध्या मोठे संकट उभे राहिले आहे. योग्य वेळेत पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या आहेत आणि कृषी क्षेत्रासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. पश्चिम किनारपट्टीवरून मान्सून पुढे सरकण्याची सध्या तरी कोणतीही सकारात्मक चिन्हे दिसत नसल्याचे शर्मा यांनी सांगितले आहे. मुंबईला खऱ्या अर्थाने मान्सूनच्या पहिल्या दमदार पावसासाठी आणखी १० दिवस वाट पाहावी लागली, तरी त्यात आश्चर्य वाटू नये, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यापूर्वी, २०१९ साली एल-निनो वर्षात, मान्सून मुंबईत सर्वात उशिरा म्हणजे २५ जून रोजी पोहोचला होता. थोडक्यात, मान्सूनची रखडपट्टी आणि आगामी काळातील हवामानाचा अंदाज पाहता, शेतीकामे आणि मुंबईसारख्या शहरांना पावसासाठी अजूनही प्रदीर्घ प्रतीक्षा करावी लागणार आहे.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## शक्तिशाली 'एल निनो' कन्फर्म; भारतात पावसाची तूट, कृषी क्षेत्रावर मोठे संकट

### फेब्रुवारी-मार्च २०२७ पर्यंत प्रभाव राहण्याची शक्यता

जन सम्राट टाईम्स

**वॉशिंग्टन/नवी दिल्ली | प्रतिनिधी :** अमेरिकेची 'नॅशनल ओशनिक अँड अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशन' (एनओएए) या संस्थेने विषुववृत्तीय प्रशांत महासागरामध्ये 'एल निनो' आल्याची अधिकृत पुष्टी केली आहे. हा एल निनो मागील अनेक दशकांतील सर्वात ताकदवान मानला जात असून, त्याचा प्रभाव फेब्रुवारी-मार्च २०२७ पर्यंत राहण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये याचा सर्वाधिक परिणाम दिसून येईल. समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा २ अंश सेल्सिअसने अधिक राहण्याची ६३ टक्के शक्यता असल्याने याला "व्हेरी स्ट्रॉंग" एल निनोच्या श्रेणीत ठेवण्यात आले



आहे. १९५१ पासून आतापर्यंत असे केवळ सहाच 'एल निनो' नोंदवले गेले आहेत. भारतीय हवामानशास्त्र विभाग (आयएमडी) ने स्पष्ट केले आहे आहे की, मान्सून जसा पुढे सरकेल, तसतसा एल निनो अधिक मजबूत होईल. १९५१ पासून आलेल्या १७ एल निनो वर्षांपैकी १२ वर्षांमध्ये सामान्यपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. यावर्षी आयएमडीने 'लॉंग पिरियड एव्हरेज' (एलपीए) च्या ९० टक्के पावसाचा अंदाज वर्तवला आहे, जो खरा ठरल्यास २०१५ नंतरचा हा सर्वात कमकुवत मान्सून ठरेल. सद्यस्थितीत, ४ जून रोजी केरळमध्ये तीन दिवस उशिराने दाखल झालेल्या मान्सूनमध्ये १५ जूनपर्यंत देशात ३२ टक्के पावसाची तूट नोंदवली गेली आहे. 'पॉझिटिव्ह आयओडी' (इंडियन ओशन डायपोल) एल निनोचा प्रभाव कमी करू शकतो, मात्र संपूर्ण मान्सून हंगामात 'न्यूट्रल आयओडी' राहण्याची शक्यता आयएमडीने वर्तवली आहे.पावसाच्या या तुटीचा आणि 'एल निनो'चा सर्वाधिक फटका कृषी आणि अन्न उत्पादनाला बसण्याची शक्यता आहे. जर पुढचा एक महिना पावसाची तूट राहिली, तर खरीप पिकांच्या पेरणीवर मोठा दबाव येऊ शकतो. भारताकडे तांदळाचा पुरेसा सरकारी साठा असल्याने खरीपातील धान पिकाची स्थिती हाताळता येईल, मात्र पावसावर अवलंबून असणाऱ्या डाळी आणि तेलबियांचे मोठे नुकसान होऊ शकते. भारतीय हवामानशास्त्र विभाग (आयएमडी) ने स्पष्ट केले आहे आहे की, मान्सून जसा पुढे सरकेल, तसतसा एल निनो अधिक मजबूत होईल. १९५१ पासून आलेल्या १७ एल निनो वर्षांपैकी १२ वर्षांमध्ये सामान्यपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे.प्रदीर्घ कोरडा काळ आणि उष्ण मान्सूनमुळे कीड व आजारांचा धोका वाढणार असून, भाजीपाला पिकांना सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे, तसेच दुग्धोत्पादनही प्रभावित होऊ शकते. याचा परिणाम महागाईवरही दिसत असून, जानेवारीत २.१ टक्के असलेला किरकोळ अन्न महागाई दर मे महिन्यात ४.८ टक्क्यांवर पोहोचला आहे.

### पाणीपुरवठा, जलविद्युत क्षेत्रांवरही सावट

शेती व्यतिरिक्त देशातील पाणीपुरवठा आणि जलविद्युत क्षेत्रांवरही एल निनोचे मोठे सावट आहे. भारतात वर्षभरातील ७५ टक्के पाऊस जून ते सप्टेंबर या मान्सून काळात पडतो, ज्यामुळे भूजल पातळी वाढते, धरणे भरतात आणि घरगुती वापरासह उद्योगांना व जलविद्युत प्रकल्पांना पाणी उपलब्ध होते. अहवालानुसार, जर हा एल निनो २०२७ पर्यंत टिकला, तर पुढील वर्षीही तापमानात मोठी वाढ होण्याचा धोका आहे. अशा परिस्थितीत, भारताच्या काही भागांमध्ये २०१६ च्या उन्हाळ्यासारखी पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याची भीती वर्तवण्यात आली आहे.

### मुंबईत अत्याधुनिक मीडिया हब उभारणार



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** मुंबईत केंद्र सरकारच्या सहकार्याने एक अत्याधुनिक 'मीडिया हब' उभारण्याची महत्त्वपूर्ण घोषणा सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी केली आहे. दादर येथील रवींद्र नाट्य मंदिरात सुरू झालेल्या १९ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी ही घोषणा केली. या नव्या मीडिया हबमुळे आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी'सारख्या पुढाकारांमुळे चित्रपट, अॅनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स (व्हीएफएक्स) आणि विशेषतः वेगाने वाढणाऱ्या डिजिटल कंटेंट निर्मितीच्या क्षेत्राला एक नवी आणि व्यापक दिशा मिळणार आहे. मुंबई ही आता केवळ 'स्वप्ननगरी' राहिलेली नसून ती सर्जनशील उद्योगांचे एक मोठे जागतिक केंद्र बनत असल्याचे स्पष्ट करत, प्रादेशिक चित्रपटांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देण्यासोबतच महाराष्ट्रात चित्रीकरण विनामूल्य करण्याच्या निर्णयाद्वारे मनोरंजन क्षेत्राला भक्कम पाठबळ देण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे कटिबद्ध असल्याचेही मंत्री आशिष शेलार यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

# तुकाराम मुंडे यांची बदली नको; बौद्धभूमीचे पुनर्वसन तातडीने करा

## संविधान संरक्षण समितीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी:** संविधान संरक्षण समिती, जिल्हा धुळे यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष आण्णासाहेब हरिश्चंद्र लोंढे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना धुळे जिल्हा प्रशासनामार्फत विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्या माध्यमातून शासनाकडे पाठविण्यात आले.

निवेदनात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभरात अन्न व औषध भेसळ, गुटखा आणि अवैध व्यवसायांविरोधात राबविलेल्या धडक कारवायांचे विशेष कौतुक करण्यात आले आहे.

त्यांच्या प्रामाणिक, पारदर्शक आणि कार्यक्षम कामकाजामुळे जनतेच्या आरोग्याचे संरक्षण होत असून शासनाची प्रतिमाही अधिक मजबूत होत असल्याचे समितीने नमूद केले आहे. यामुळे तुकाराम मुंडे यांची बदली अन्यत्र करू नये तसेच राज्यातील वाढत्या गुन्हेगारी आणि बेकायदेशीर व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी त्यांना अधिक महत्त्वाची जबाबदारी सोपवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच भेसळखोर आणि गुटखा माफियांविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवायांमुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता त्यांना 'झेड' दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात यावी, अशीही मागणी समितीने शासनाकडे केली आहे. याचबरोबर कल्याण येथील बौद्धभूमीच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा तसेच बौद्ध बांधवांच्या भावना दुखावणाऱ्या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी संविधान संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, ज्येष्ठ पत्रकार गो. पी. लांडगे, कॉम्रेड एल. आर. राव, दीपक जाधव, जी. डी. जाधव, बी. टी. अहिरे, डॉ. श्रीकृष्ण बेडसे, हर्षबोध मोरे, काशिनाथ शिंदे, छोटू मोरे, मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर, विजय वाघ, कॉम्रेड पोपटराव चौधरी, कॉम्रेड वसंत पाटील, दीपक सोनवणे यांच्यासह समितीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी

भेसळखोर आणि गुटखा माफियांविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवायांमुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता त्यांना 'झेड' दर्जाची सुरक्षा प्रदान करण्यात यावी, अशीही मागणी समितीने शासनाकडे केली आहे. याचबरोबर कल्याण येथील बौद्धभूमीच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा तसेच बौद्ध बांधवांच्या भावना दुखावणाऱ्या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी संविधान संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, ज्येष्ठ पत्रकार गो. पी. लांडगे, कॉम्रेड एल. आर. राव, दीपक जाधव, जी. डी. जाधव, बी. टी. अहिरे, डॉ. श्रीकृष्ण बेडसे, हर्षबोध मोरे, काशिनाथ शिंदे, छोटू मोरे, मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर, विजय वाघ, कॉम्रेड पोपटराव चौधरी, कॉम्रेड वसंत पाटील, दीपक सोनवणे यांच्यासह समितीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्रम्पकडून नेतन्याहू यांना कडक इशारा



**कतार:** येथे नुकत्याच झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना थेट शब्दांत इशारा दिला आहे. "माझ्याशिवाय इस्राईलचे अस्तित्व शक्य नव्हते," असे अत्यंत परखड विधान त्यांनी केले. या बैठकीचा एक व्हिडिओ सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि समाजमाध्यमांवर वेगाने व्हायरल होत असून, त्यात ट्रम्प हे नेतन्याहू यांच्याशी अत्यंत स्पष्ट शब्दांत बोलताना आणि आपल्या मदतीची जाणीव करून देताना दिसत आहेत. या ताज्या घडामोडीतून अमेरिकेने इस्राईलला आजवर दिलेल्या भक्कम राजकीय, मुत्सद्दी आणि लष्करी पाठिंब्याचा संदर्भ देत ट्रम्प यांनी आपली वर्चस्वाची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. एका बाजूला मध्यपूर्वेतील तणावाचे वातावरण असताना, कतारसारख्या मध्यस्थ देशात झालेल्या या भेटीतील ट्रम्प यांच्या या आक्रमक विधानामुळे अमेरिका-इस्राईल संबंध आणि आगामी काळातील धोरणात्मक निर्णयांबाबत जागतिक राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

# धरणगाव नूतन विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सौ. माळी यांची बिनविरोध निवड

## मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

जन सम्राट टाईम्स



नूतन विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर सौ. संगीता माळी यांचे अभिनंदन करताना शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, निलेश चौधरी, लक्ष्मण माळी व संस्थेचे पदाधिकारी.

**धरणगाव । प्रतिनिधी** :धरणगाव येथील नूतन विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सौ. संगीता देवालाल माळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या निवड प्रक्रियेमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, महिला नेतृत्वाला आणखी बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया निवडणूक अधिकारी अतुल महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निवडीनंतर नवनियुक्त चेअरमन सौ. संगीता माळी यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी त्या प्रभावी नेतृत्व करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, ज्ञानेश्वर महाजन, निलेश चौधरी, माळी समाजाध्यक्ष व्ही. टी. माळी, रामकृष्ण महाजन यांच्यासह संस्थेचे संचालक विश्वास बयस, शालिक मराठे, किशोर कंखरे, राजेंद्र चव्हाण, कैलास मराठे, जयराम पाटील, राजेंद्र पवार, सुभाष महाजन, सोमा साळी, सुरेखा पाटील, सोमनाथ महाजन, आर. डी. महाजन तसेच परमेश्वर महाजन, हेमंत महाजन, रामभाऊ महाजन, गोपाल महाजन, लक्ष्मण माळी, रमेश माळी, सुखदेव माळी, कालिदास बाविस्कर, निंबा जंगलू निकम, विजय महाजन, पुनमचंद महाजन, जयेश महाजन, देवालाल महाजन, दयाराम मराठे, नाना पाटील, कैलास महाजन, मयूर महाजन आणि दुर्गेश महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. याशिवाय संस्थेचे सेक्रेटरी भिकनसिंग परिहार, लिपिक छगन पाटील आणि शिपाई ज्ञानेश्वर पुरभे यांनीही नवनियुक्त चेअरमन यांचे अभिनंदन करून भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांनी नूतन विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी अधिक गतिमान व लोकाभिमुख कामकाज होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. सौ. संगीता माळी यांच्या बिनविरोध निवडीमुळे विशेषतः महिलांमध्ये समाधानाचे वातावरण असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था विकासाची नवी उंची गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### नेतृत्वाला आणखी बळ मिळाल्याची भावना

उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या निवड प्रक्रियेमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, महिला नेतृत्वाला आणखी बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया निवडणूक अधिकारी अतुल महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निवडीनंतर नवनियुक्त चेअरमन सौ. संगीता माळी यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# पीक विमा थकीत प्रकरणी शिरपूर फर्स्ट आक्रमक!

## कार, रिक्षासह सात दुचाकी जप्त

जन सम्राट टाईम्स



**शिरपूर । प्रतिनिधी :** प्रधानमंत्री फसल विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२५ मधील कापूस पिकाचा विमा अद्यापही अनेक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिरपूर फर्स्ट संघटनेने आक्रमक भूमिका घेत तहसीलदारांना निवेदन सादर केले. यानंतर तहसील कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक पार पडली असून, पात्र शेतकऱ्यांना येत्या महिन्याभरात पीक विम्याची रक्कम वितरित करण्यात येईल, असे आश्वासन पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी दिले. तहसीलदारांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीस संबंधित पीक विमा कंपनीचे प्रतिनिधी, तालुका कृषी अधिकारी तसेच शिरपूर फर्स्टचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत शेतकऱ्यांनी भरलेला विमा हप्ता आणि प्रत्यक्ष नुकसान होऊनही अद्याप विमा न मिळाल्याने अनेक शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडल्याचा मुद्दा संघटनेने ठळकपणे मांडला. शिरपूर फर्स्टच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे प्रलंबित दावे तातडीने निकाली काढण्याची मागणी केली. वारंवार पाठपुरावा करूनही अनेक शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्यामुळे संबंधित यंत्रणांनी त्वरित कार्यवाही करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. यावर पीक विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी आवश्यक अहवाल सादर करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे स्पष्ट केले. सर्व अहवाल शासनाकडे सादर झाल्यानंतर पात्र व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात येत्या महिनाभरात विमा रक्कम जमा करण्यात येईल, असे त्यांनी बैठकीत आश्वासन दिले.

### आर्थिक संकटातून दिलासा मिळावा

शिरपूर फर्स्टचा लढा यापुढेही सुरू राहणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. निर्धारित कालावधीत विमा रक्कम वितरित न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला. शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा पीक विमा वेळेत मिळावा आणि आर्थिक संकटातून दिलासा मिळावा, यासाठी प्रशासनाने प्रभावी आणि तातडीची कार्यवाही करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अमळनेर रेल्वे स्थानकावर खळबळ!

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर| प्रतिनिधी:** अमळनेर रेल्वे स्थानक परिसरात मध्यरात्री घडलेल्या एका धक्कादायक घटनेमुळे रेल्वे प्रशासनासह संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. रेल्वे संरक्षण दल (RPF) मधील जयपाल नामक जवानाने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेत जवान गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर धुळे येथे उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या दरम्यान रेल्वे स्थानक परिसरातील RPF कार्यालयात घडली. संबंधित जवानाने स्वतःच्या डोक्यात गोळी झाडल्याचे सांगितले जात असून, घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती मिळताच सहकाऱ्यांनी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने जखमी जवानाला उपचारासाठी हलविले. प्राथमिक वैद्यकीय उपचारानंतर त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी धुळे येथे रेफर करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत डॉ. अनिल शिंदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याची माहिती समोर येत आहे. आत्महत्येच्या प्रयत्नामागील कारण गुलदस्त्यात जयपाल यांनी इतके टोकाचे पाऊल का उचलले, यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत शहाद्यात 'आमचा गाव, आमचा विकास' प्रशिक्षण उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**शहादा | प्रतिनिधी:** राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत 'आमचं गाव, आमचा विकास' मोहिमेच्या माध्यमातून सन २०२६-२७ या वर्षाचा ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने तयार करण्यासाठी शहादा येथील एस. कुमार लॉन्स येथे मंगळवारी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायतींच्या विकासाला नियोजनबद्ध दिशा देणारे हे प्रशिक्षण मोठ्या उत्साहात आणि यशस्वी वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती शहादाचे गटविकास अधिकारी महेश पोद्दार होते. संत गाडगे महाराज, कुलदेवी देवमोगरा माता, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. ईश्वर माळी आणि डोंगरगावच्या सरपंच यमुनाबाई ठाकरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. १६ वा वित्त आयोग आणि 'पेसा' निधीवर विशेष मार्गदर्शन प्रशिक्षणादरम्यान "सर्वांची योजना, सर्वांचा विकास" या संकल्पनेनुसार सन २०२६-२७ चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक बाबींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नवीन डिजिटल पोर्टलची माहिती शासनाने ग्रामपंचायत स्तरावरील नियोजन अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी सुरू केलेल्या नवीन डिजिटल पोर्टलची माहितीही प्रशिक्षणात देण्यात आली. गावाच्या गरजेनुसार विकासकामांचा आराखडा तयार करून तो ऑनलाइन पद्धतीने पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया, तांत्रिक बाबी आणि संभाव्य त्रुटी टाळण्याचे मार्ग यांचे प्रात्यक्षिक सादरीकरण करण्यात आले. मुख्य प्रशिक्षक मुकेश कापुरे, नीता पाटील आणि लिलेश्वर खैरनार यांनी प्रत्यक्ष स्क्रीन सादरीकरणाद्वारे पोर्टलच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली. या प्रणालीमुळे ग्रामपंचायतींचे विकास आराखडे अधिक पारदर्शक आणि वेळेत मंजूर होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या प्रशिक्षणाचा लाभ शहादा तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, सदस्य, ग्रामविकास अधिकारी तसेच संगणक चालकांनी मोठ्या संख्येने घेतला.

# नशिराबादच्या 'ग्लोबस इंग्लिश मीडियम स्कूल'मध्ये 'विद्यारंभ संस्कार' सोहळा उत्साहात


जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी :** नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षणासोबत संस्कारांची बीजे रुजविण्याच्या उद्देशाने नशिराबाद येथील ग्लोबस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'विद्यारंभ संस्कार' सोहळा मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात पार पडला. शाळेत प्रथमच प्रवेश करणाऱ्या चिमुकल्यांचे मंगलमय वातावरणात स्वागत करण्यात आले, त्यामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती आणि मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे पालकांनीही मनापासून स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात संस्कारमय वातावरणात व्हावी, या उद्देशाने शाळा प्रशासनाने विशेष नियोजन केले होते. 'अनुभवातून शिक्षण' हीच शाळेची ओळख ग्लोबस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये केवळ पाठांतरावर भर न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून आणि अनुभवातून शिक्षण दिले जाते. 'ॲक्टिव्हिटी बेस्ड लर्निंग'च्या माध्यमातून प्रत्येक विषय अधिक रंजक आणि समजण्यास सोपा करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांचा बौद्धिक, सामाजिक आणि वैचारिक विकासही घडतो. शाळा प्रशासनाच्या मते, विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर नैतिक मूल्ये आणि संस्कारांनीही समृद्ध व्हावे, यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. संस्कारक्षम पिढी घडविण्याचा संकल्प "आम्ही विद्यार्थ्यांना केवळ गुण मिळविण्यासाठी नव्हे, तर उत्तम व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी शिक्षण देतो. संस्कार, मूल्ये आणि वैचारिक प्रगती यांना आमच्या शैक्षणिक प्रक्रियेत विशेष स्थान आहे," असे शाळा प्रशासनाने यावेळी सांगितले. पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासोबत भारतीय संस्कृतीची जोड देणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे पालकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने झालेले स्वागत आणि संस्कारमय वातावरण पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले.

# कुटुंबातच होणाऱ्या वाटणीची मोजणी आता २०० रुपयात!

## राज्य शासनाचा सर्वसामान्यांना दिलासा



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्य शासनाने सर्वसामान्यांना मोठा दिलासा देत जमीन मोजणीच्या शुल्क आणि प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केलेल्या नव्या निर्णयानुसार, आता कुटुंबातच होणाऱ्या संमतीच्या किंवा कोर्टाच्या वाटणीची मोजणी अवघ्या २०० रुपये प्रति पोटहिस्सा या नाममात्र शुल्कात केली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे मोजणी प्रक्रियेतील प्रशासकीय विलंब आणि भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा बसणार आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी आता 'नियमित मोजणी' ९० दिवसांत आणि 'द्रुतगती मोजणी' केवळ ३० दिवसांत पूर्ण करणे महसूल विभागासाठी बंधनकारक करण्यात आले आहे. या नव्या धोरणात ग्रामीण आणि शहरी भागांसाठी मोजणीचे सुस्पष्ट दर आणि नियम निश्चित करण्यात आले आहेत. ग्रामीण भागात २ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी २ हजार रुपये (द्रुतगतीसाठी ८ हजार रुपये), तर शहरी भागात १ हेक्टरपर्यंत नियमित मोजणीसाठी ३ हजार रुपये (द्रुतगतीसाठी १२ हजार रुपये) शुल्क आकारले जाईल. मोजणीच्या दिवशी अर्जदार गैरहजर राहिल्यास त्याला मूळ फीच्या ५० टक्के किंवा कमाल १० हजार रुपयांपर्यंत 'पुनर्भेट शुल्क' (दंड) आकारला जाईल; मात्र भूमापक अधिकारी गैरहजर राहिल्यास अर्जदाराला कोणताही दंड लागणार नाही. यासोबतच निमशासकीय आणि सरकारी संस्थांना मोजणी दरात ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार असून, गुंठेवारी अधिनियमांतर्गत येणाऱ्या भूखंडांसाठी दीडपट शुल्क निश्चित करण्यात आले आहे. महसूल विभागातर्फे सर्वसामान्यांच्या जमिनीच्या प्रश्नांवर निर्णय घेतानाच, राज्याच्या जलसंवर्धनासाठीही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यातील नद्या आणि नाल्यांच्या खोलीकरणाच्या कामांना गती देण्यासाठी राज्य शासन लवकरच एक स्वतंत्र आणि नवीन योजना आणणार आहे. नागपूर आणि अमरावती विभागातील नद्या-नाल्यांमध्ये साचलेल्या गाळामुळे भूजल पातळी, सिंचन आणि पूरनियंत्रणावर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी तातडीने मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. विविध प्रशासकीय विभागांच्या मंजुरी प्रक्रियेत होणारा विलंब टाळण्यासाठी या कामांचे आवश्यक अधिकार थेट जिल्हाधिकाऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# भुसावळात शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

## 'चला शिवरायांची युद्धकला आत्मसात करूया' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ । प्रतिनिधी:** सध्याच्या काळात मुली आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वसंरक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन 'भक्ती शक्ती शिवकालीन युद्ध कला गुरुकुलम, अण्णा नगर' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य 'शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिर' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. "चला शिवरायांची युद्धकला आत्मसात करूया" हा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे आयोजन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि जय मातृभूमी क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. ६ जून ते १४ जून या कालावधीत संतोषी माता हॉल शेजारील जय मातृभूमी क्रीडा मैदानावर पार पडलेल्या शिबिरात ६ ते ६० वर्षे वयोगटातील प्रशिक्षणार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. रायगडचे प्रमुख प्रशिक्षक आशिष जी खैरे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी विद्यार्थ्यांना शिवकालीन युद्धकलेचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये भारतीय पारंपरिक व्यायामप्रकारांतील दंड-बैठक, लाठी-काठी, तलवारबाजी, दांडपट्टा आणि भाला चालविण्याची प्रात्यक्षिके तसेच त्यामागील शिस्त आणि कौशल्य यांचे मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरातील विशेष आकर्षण म्हणजे मुली आणि महिलांसाठी घेण्यात आलेले आत्मसंरक्षण प्रशिक्षण होय. दैनंदिन वापरातील वस्तूंचा उपयोग करून संकटसमयी स्वतःचे संरक्षण कसे करावे, याचे व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे उपस्थित महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून आले. याशिवाय मुलांच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासासाठी भारतीय बौद्धिक खेळांचे आयोजन करण्यात आले. भारतीय संस्कृती, रामायण, महाभारत, छत्रपती शिवाजी महाराज, त्यांचे शूर मावळे आणि स्वातंत्र्यवीरांच्या जीवनचरित्रावर आधारित प्रेरणादायी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

'भक्ती शक्ती युद्धकला प्रशिक्षण आणि संस्कृती संवर्धन, जळगाव' या संस्थेच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले.

### दांडपट्टा आणि भाला चालविण्याची प्रात्यक्षिके

अवघ्या २०० रुपयांच्या प्रवेश शुल्कात आयोजित या उपक्रमाला भुसावळकरांनी मोठा प्रतिसाद दिला. शिबिराच्या सांगता समारंभात प्रशिक्षणार्थ्यांनी सादर केलेल्या मर्दानी खेळांच्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थित पालक आणि नागरिकांची मने जिंकली. शिवकालीन युद्धकलेचा वारसा जपत महिलांना स्वसंरक्षणासाठी सक्षम बनविण्याचा उद्देश या उपक्रमातून यशस्वीरीत्या साध्य झाल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. भारतीय पारंपरिक व्यायामप्रकारांतील दंड-बैठक, लाठी-काठी, तलवारबाजी, दांडपट्टा आणि भाला चालविण्याची प्रात्यक्षिके तसेच त्यामागील शिस्त आणि कौशल्य यांचे मार्गदर्शन करण्यात आले. व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले.